दु२४४७६९३८-०२०.क्र.
Email-
researchdept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.

जा.क्र.राशैसंप्रपम/संशोधन/नवोपक्रम स्पर्धा/२०२२-२३/५१३२ दि.३१/१०/२०२२

# संशोधन विभाग
# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२२-२३
## माहितीपत्रक

संपूर्ण जगभर उद्भवलेल्या कोविड-१९ या महामारीच्या काळातही सर्व मुलांचे शिक्षण सुरु राहावे यासाठी सर्वत्र प्रयत्न होत आहेत. याचबरोबर राज्यातील नवोपक्रमशील शिक्षक व अधिकारी विद्यार्थ्यांच्या अध्ययनात खंड पडू नये यासाठी नवनवीन उपक्रम तसेच कल्पनांचा वापर करत आहेत. तसेच प्रत्येक मूल प्रगत होण्यासाठी शिक्षक व अधिकारी प्रयत्न करीत आहेत. त्यांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती राज्यातील शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांना व्हावी तसेच सर्वच स्तरातील शिक्षक व अधिकारी यांच्या नवोपक्रमशीलतेला व सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत सन २०२२-२३ या वर्षासाठी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा पुढील पाच गटात आयोजित करण्यात येत आहे.

१. पूर्व प्राथमिक गट (अंगणवाडी कार्यकर्त्या/सेविका व पर्यवेक्षिका)
२. प्राथमिक गट (उपशिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक)
३. माध्यमिक, उच्च माध्यमिक गट (माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक)
४. विषय सहायक, विषय साधन व्यक्ती, समावेशित साधन व्यक्ती व ग्रंथपाल गट
५. अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गट (अध्यापकाचार्य, केंद्रप्रमुख ते शिक्षणाधिकारी, अधिव्याख्याता व वरिष्ठ अधिव्याख्याता)

ही स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. सृजनात्मक कार्याची आवड असणाऱ्या नवोपक्रमशील शिक्षक व अधिकाऱ्यांनी या स्पर्धेत भाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

- **राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेची उद्दिष्टे :**

१. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील अध्ययन अध्यापनात सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षक व अधिका-यांना प्रोत्साहन देणे.
२. शिक्षक व अधिका-यांना दैनंदिन कामकाजात नाविन्यता आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.
३. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तर तसेच डी.एल.एड. विद्यालय ते प्रशासन यामध्ये गुणवत्तेच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रात नवनवीन संकल्पना, विचारप्रवाह, तंत्रे आणि अध्ययन अध्यापन पद्धती यांचा निरंतर शोध घेणा-या शिक्षक व अधिका-यांना उत्तेजन देणे.
४. शिक्षक, अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिका-यांमधील सृजनशीलता व संशोधक वृत्ती वाढीस लावणे.
५. शिक्षण क्षेत्रामध्ये विविध विषयांवर केलेले उपयुक्त नाविन्यपूर्ण नवोपक्रम इतर शिक्षकांच्या व शैक्षणिक प्रशासनाच्या माहितीसाठी ऑनलाइन प्रकाशित करणे.

- **नवोपक्रम अहवाल लेखन मुद्दे**

नवोपक्रम अहवाल लेखन पुढील मुद्यांच्या आधारे करावे

१) **नवोपक्रमाचे शीर्षक** – उपक्रमाचे नेमके नाव लिहावे.

२) **नवोपक्रमाची गरज व महत्त्व** – उपक्रम निवडण्याचे कारण, उपक्रमाचे वेगळेपण, उपयुक्तता इ. चा तपशील.

३) **नवोपक्रमाची उद्दिष्टे** – हा उपक्रम मी का करतो आहे, उपक्रमाचा फायदा कोणाला? कसा, कोणत्या स्वरुपात, कोणत्या कृतीमुळे होणार? या उपक्रमातून काय व कोणासाठी साध्य होणार, याबाबत ३ ते ५ विधानात्मक उद्दिष्टे मांडावीत.

४) **नवोपक्रमाचे नियोजन** –

i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण
ii) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा
iii) आवश्यक साधनांचा विचार
iv) करावयाच्या कृतींचा क्रम
v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण
vi) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)
vi) उपक्रमासाठी इतरांची मदत
viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

५) **नवोक्रमाची कार्यपद्धती** –

I. पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी
II. कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन
III. उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी
IV. कार्यवाही करताना आलेल्या अडचणी
V. माहितीचे विश्लेषण : आलेख, तक्ते (आवश्यक वाटल्यास)

६) **नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार)**

या उपक्रमातून काय साध्य झाले व शिक्षण क्षेत्रातील कोणत्या घटकाला या उपक्रमाचा लाभ झाला, याबाबतची मांडणी यात करावी. उद्दिष्टनिहाय फलश्रुती लिहावी. आवश्यकता वाटल्यास त्याकरिता शेकडेवारी व आलेखाचा वापर करता येईल. अन्यथा वर्णनात्मक विधाने करावी. त्याचप्रमाणे आपण उपक्रमांतर्गत केलेल्या विविध कृतींची फलश्रुती विषद करावीत.

७) **समारोप** – आपल्या उपक्रमाचा उपयोग गुणवत्ता वाढीसाठी कसा झाला, हे विशद करावे.

८) **संदर्भसूची व परिशिष्टे** – नवोपक्रम करताना ज्या संदर्भग्रंथांचा वापर केला, त्यांची सूची द्यावी तसेच सहभागी वर्गातील विद्यार्थी व आवश्यकता असल्यास त्यांच्यासाठी तयार केलेली पूर्वचाचणी, उत्तर चाचणी, प्रश्नावली इ. जे असेल ते परिशिष्टामध्ये जोडावे.

**९) नवोपक्रम अहवाल लेखनाबाबत मार्गदर्शनासाठी https://youtu.be/7_BjMmcx1Hc या लिंकवर जाऊन व्हिडीओ पाहावा.**

- ## स्पर्धेसाठी पात्रतेच्या अटी

१. स्पर्धेत भाग घेणारे स्पर्धक हे जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तसेच अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये इ. १ ली ते १२ वीला अध्यापन करणारे असावेत. माध्यमिक शाळांमधील इ. ६ वी ते ८वी ला शिकवणारे शिक्षक प्राथमिक स्तर स्पर्धेसाठी गणले जातील.

२. राज्यातील ICDS विभागाच्या अधिनस्थ अंगणवाडीतील कार्यकर्ती/ सेविका व पर्यवेक्षिका या स्पर्धेसाठी भाग घेऊ शकतील.

३. डी.एल.एड. विद्यालयातील अध्यापकाचार्य व शिक्षणक्षेत्रातील पर्यवेक्षकीय अधिकारी (केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण), गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, अधिव्याख्याता, जेष्ठ अधिव्याख्याता) या स्पर्धेत भाग घेऊ शकतील.
४. स्पर्धक सध्या SCERT/ प्रादेशिक विद्या प्राधिकरण (RAA)/ DIET मध्ये विषय सहाय्यक / DIET अंतर्गत विषय साधन व्यक्ती म्हणून कार्यरत असावा.

- **स्पर्धेचे नियम**

नवोपक्रम स्पर्धेचे नियम खालील प्रमाणे :

१. राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा वर्षातून एकदाच घेण्यात येईल.
२. स्पर्धकाने सादर करीत असलेला नवोपक्रम यापूर्वी या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नसावा. त्यासाठी स्पर्धकाने स्वघोषित प्रमाणपत्र सादर करावे. (प्रमाणपत्राचा नमुना सोबत दिला आहे.)
३. नवोपक्रम शिक्षकांनी स्वतः राबविलेला असावा. याबाबतीत शिक्षकांनी नवोपक्रमाच्या प्रकल्प अहवालासमवेत खालील नमुन्यात प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.
४. सादर करण्यात आलेला नवोपक्रम पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना / मुलांना उपयुक्त ठरणाऱ्या कोणत्याही विषयावरील असावा. या स्पर्धेसाठी कृतिसंशोधन व लघुसंशोधन पाठवू नये.
५. नवोपक्रम लेखन मराठी, इंग्रजी किंवा हिंदी यांपैकी कोणत्याही एका भाषेत लिहिलेला असावा.
६. नवोपक्रम टाईप केलेला असावा. टाईपिंग साठी Unicode या फॉन्टचाच वापर करावा. फॉन्ट साईझ १२, पेज मार्जिन डावी बाजू दीड इंच व उजवी बाजू, वरील बाजू, तसेच खालच्या बाजूस प्रत्येकी १ इंच मार्जिन/समास असावा.
७. हस्तलिखित करून स्कॅन केलेला नवोपक्रम स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही.
८. सादर करण्यात आलेला नवोपक्रम हा सन २०२१-२२ किंवा सन २०२२-२३ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेला असावा.
९. नवोपक्रम अहवाल शब्द मर्यादा ४००० ते ५००० असावी. फाईलमध्ये नवोपक्रमाशी निगडीत जास्तीत जास्त ५ फोटोंचा समावेश अहवाल लेखनात करावा.
१०.राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेची लिंक भरताना त्यामध्ये १०० शब्द मर्यादेत नवोपक्रमाचा संक्षिप्त सारांश लिहिणे आवश्यक आहे.
११.राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेची लिंक भरताना स्पर्धकाने स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो अपलोड करावा. नवोपक्रम फाईल PDF व MS WORD स्वरूपात जोडावी. PDF फाईल ५ MB पेक्षा जास्त नसावी.
१२.स्पर्धकाने आपल्या नवोपक्रमाशी निगडीत इतरांना उपयुक्त होईल असा व्हिडिओ अथवा youtube वर असलेली लिंक नवोपक्रम स्पर्धेच्या लिंकवर विहित ठिकाणी नोंदवावी.
१३.राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२२-२३ साठी स्पर्धकांनी आपले नवोपक्रम **https://scertmaha.ac.in/innovation/** या लिंकवर दि.०२/११/२०२२ ते दि.२०/११/२०२२ या कालावधीत अपलोड करावेत.
१४.जिल्हास्तर, विभाग स्तर व  राज्यस्तरावर प्रथम १० क्रमांकांच्या स्पर्धकांना आपापल्या नवोपक्रमाचे सादरीकरण करणे बंधनकारक असेल.

१५.राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पारितोषिके व उत्तेजनार्थ बक्षीसपात्र स्पर्धकांनी आपल्या नवोपक्रम अहवालाची एक प्रत संशोधन विभागाकडे कार्यक्रमाच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील.

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ......................................................... प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला ......................................................... .................................................................................................................. हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक :

स्थळ :

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव :......................................

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ....................................... ................. हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला ..................................... ................................................................................................................... हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष --------- मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक :

स्थळ :

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव :............................................

शिक्का:

- **नवोपक्रम अहवालाचे मूल्यांकन :**

नवोपक्रम स्पर्धेचे मूल्यांकन प्रत्येक स्तरावर दोन फेरीमध्ये केले जाणार आहे. जिल्हा व विभाग स्तरावर द्वितीय फेरी ही पहिल्या फेरीत गुणानुक्रमे पहिल्या १ ते ७ क्रमांकासाठी तर राज्यस्तरावर पहिल्या फेरीतील गुणानुक्रमे पहिल्या १ ते १० क्रमांकासाठी राबविण्यात येईल.

| अ.न. | स्तर | पहिली फेरी | द्वितीय फेरी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा | अहवाल परीक्षण | नवोपक्रम सादरीकरण |
| २ | प्रादेशिक विद्या प्राधिकरण | अहवाल परीक्षण | नवोपक्रम सादरीकरण |
| ३ | राज्य | अहवाल परीक्षण | नवोपक्रम सादरीकरण |

जिल्हास्तर व प्रादेशिक विद्या प्राधिकरण स्तरावर प्रथम फेरीत नवोपक्रम अहवालांचे मूल्यांकन करून प्रथम १ ते ७ क्रमांकावर असलेल्या नवोपक्रमांचे सादरीकरण कार्यालयात करून द्वितीय फेरीत मूल्यांकन करण्यात येईल. द्वितीय फेरीतील गुणांच्या आधारावरच जिल्हा व विभाग प्रथम पाच क्रमांक निर्धारित करण्यात येऊन तेच पुढे राज्यस्तरावर पाठविण्यात येतील.

(टीप : मुंबई शहर व उपनगर या दोन जिल्ह्यांसाठी या स्पर्धेचे पाच ही गटाचे मूल्यमापन प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई या स्तरावर करण्यात येईल.)

**नवोपक्रम अहवालाचे जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर मूल्यांकन पुढील निकषांच्या आधारावर करण्यात येईल. स्पर्धेचा निकाल सर्वस्वी परीक्षकांवर अवलंबून राहील.**

| अ.क्र. | निकष | प्रथम फेरी गुण | द्वितीय फेरी गुण | विचारात घ्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| १ | नवोपक्रम उद्दिष्टे, गरज व महत्व | १० | -- | प्रथम फेरीतील गुण |
| २ | उपक्रमातील नाविन्यता | २५ | २५ | द्वितीय फेरीतील गुण |
| ३ | नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही | २५ | २५ | द्वितीय फेरीतील गुण |
| ४ उप | यशस्विता व उपयुक्तता किती मुले प्रगत होण्यास मदत झाली/किती शिक्षकांना उपयुक्त झाले.) | २५ | २५ | द्वितीय फेरीतील गुण |
| ५ | अहवाल लेखन,संदर्भसूची व परिशिष्टे | १५ | --- | प्रथम फेरीतील गुण |
| | **एकूण गुण** | १०० | **एकूण गुण** | १०० पैकी |

राज्यस्तरावर वरीलप्रमाणेच नवोपक्रम अहवालावरून प्रथम फेरीतील गुणांच्या आधारे प्रत्येक गटातील १० उत्कृष्ट नवोपक्रम काढण्यात येतील. त्या स्पर्धकांना नवोपक्रमाचे सादरीकरण करण्यासाठी बोलविण्यात येईल द्वितीय फेरीतील गुणांच्या आधारे पाच गुणानुक्रम व पुढील पाच उत्तेजनार्थ क्रमांक निश्चित करण्यात येतील.

- **राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेची कार्यवाही :**

पहिला टप्पा :

अ) जिल्हास्तरावरील पुरस्कार -

पूर्व प्राथमिक गट, प्राथमिक गट, माध्यमिक व उच्च माध्यमिक **गटातील प्रथम पाच क्रमांकामधील ज्यांना ७५ % पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले त्यांचे नवोपक्रम पुढे SCERT, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविले जातील.** त्यामुळे केवळ उत्कृष्ट नवोपक्रम राज्यस्तरावर येण्यासाठी उपयोग होईल. तसेच प्रथम पाच क्रमांकांना जिल्हास्तरावर पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

आ) विभागस्तरावरील पुरस्कार -

विषय सहायक व विषय साधन व्यक्ती तसेच अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी यांचे नवोपक्रम प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या लिंकवर जातील व त्यामधून प्रत्येक **गटातील प्रथम पाच क्रमांकामधील ज्यांना ७५ % पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले त्यांचे नवोपक्रम पुढे SCERT, महाराष्ट्र, पुणे यांचेकडे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविले जातील.** तसेच प्रथम पाच क्रमांकांना जिल्हास्तरावर पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

(टीप : मुंबई शहर व उपनगर या दोन जिल्ह्यांसाठी या स्पर्धेचे पाच ही गटाचे मूल्यांकन प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई या स्तरावर करण्यात येईल)

दुसरा टप्पा :

राज्यस्तरावरील पुरस्कार -

नवोपक्रम अहवाल लेखन व नवोपक्रम सादरीकरण या आधारित पुढील पाच गटातील पारितोषिकांचे वितरण केले जाईल.

| अ.नं. | स्तर | पारितोषिक | उत्तेजनार्थ | सादरीकरण प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्व प्राथमिक गट | प्रथम ५ | पुढील २ | पुढील ३ |
| २ | प्राथमिक गट | प्रथम ५ | पुढील २ | पुढील ३ |
| ३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक गट | प्रथम ५ | पुढील २ | पुढील ३ |
| ४ | विषय सहाय्यक व विषय साधन व्यक्ती गट | प्रथम ५ | पुढील १ | पुढील ४ |
| ५ | अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गट | प्रथम ५ | पुढील १ | पुढील ४ |

- **नवोपक्रम बँक :**

राज्य स्तरावर पुरस्कार प्राप्त सर्व नवोपक्रमांचा तसेच जिल्हा व विभाग स्तरावरील प्रत्येक गटातील गुणानुक्रमे पहिल्या पाच नवोपक्रमांचा समावेश राज्याच्या नवोपक्रम बँक (Innovation Bank) मध्ये करण्यात येईल. हे नवोपक्रम SCERT, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयाच्या वेबसाईट वर Innovation Bank मध्ये प्रसिध्द करण्यात येतील.

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे.